कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/हिंसंवि/२०२५-२६/८२८
दि. ०८/०७/२५

# कृपया प्रसिध्दीसाठी

दरवर्षीप्रमाणे कला अकादमीच्या भारतीय संगीत व नृत्य विभागातर्फे "गुरुपौर्णिमा" उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि.१० जुलै २०२५ रोजी "गुरुपौर्णिमा" व शुक्रवार दि.११ जुलै २०२५ रोजी "संगीत मेळावा" असा दोन दिवसांचा संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. गुरुवार दि.१० जुलै २०२५ रोजी कला अकादमीच्या मा. दिनानाथ मंगेशकर सभागृहात दुपारी ठिक ३.३० वाजता मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन होईल व तदनंतर गुरुपुजनाचा मुख्य कार्यक्रम संपन्न होणार आहे.

उद्घाटनानंतर शास्त्रीयगायनाने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. त्यामध्ये कु. सत्यनारायण कळंगुटकर यांचा शास्त्रीयगायनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर कु. यश सावंत यांचे संवादिनी एकलवादन सादर होईल. संवादिनी वादनानंतर कु. कैशल कवळेकर व कु. कैस्तुभ च्यारी यांचे तबला सहवादन होणार आहे. त्यानंतर कु. रिया चोयिकंदी हिचे बासरी वादन होईल.
गायन-वादनाच्या कार्यक्रमानंतर कथ्थक नृत्य व भरतनाटयम् नृत्याचा कार्यक्रम होईल त्यामध्ये कु. उमा नाईक, कु. विभा सिध्दये, कु. वेदा नाईक, कु. कन्या नाईक, कु. साक्षी देशपांडे, कु. हर्षिता च्यारी, कु. रिध्दिमा वेंगुर्लेकर या विद्यार्थीनी कथ्थक नृत्य सादर करणार असून कु. प्रतिका मराठे कु. अनुश्री कोळी, कु. तृप्ती दळवी, मुस्कान खानोलकर, कु. सोनम कांदे, कु. इच्छा नाईक, कु. आरोही सुभेदार, कु. सान्वी केंकरे, कु. श्राव्या शेट, कु. गिना पाडगांवकर, कु. शताक्षी फळगावकर, कु. आभा नाडकर्णी व कु. वरालीका पिसुर्लेकर या विद्यार्थिनी भरतनाटयम् नृत्य सादर करणार आहेत.

नृत्याच्या कार्यक्रमाला डॉ. सपना नाईक व सौ. मंदिरा तिरोडकर यांची नटवंगम साथ व सौ. वरदा बेडेकर यांची पढंतची साथ व कु. सत्यनारायण कळंगुटकर यांची गायन साथ लाभणार आहे. तसेच गायन वादनाच्या कार्यक्रमाला श्री. श्रीपाद च्यारी, श्री. सुरज मोरजकर व श्री. भार्गवराम गर्दे यांची तबलासाथ तसेच श्री. शुभम नाईक यांची संवादिनी साथ विद्यार्थांना लाभणार आहे.

दुस-या दिवशी शुक्रवार दि.११ जुलै २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता कला अकादमीच्या, पेडणे, साखळी, वाळपई, सांगे, केपे व काणकोण या संगीत केंद्रतील विद्यार्थ्यांचा "संगीत मेळावा" हा शास्त्रीय गायन-वादनाचा कार्यक्रम होणार आहे. हा कार्यक्रम कला अकादमीच्या कृष्ण कक्षात संपन्न होणार आहे. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते सकाळी १०.०० वाजता दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. सकाळच्या सत्राची सुरुवात पेडणे संगीत केंद्रातील विद्यार्थीनी कु. दृष्टी परब व कु. अन्वी धारगळकर यांच्या शास्त्रीय गायनाने होणार आहे. त्यानंतर कु. तेजस्वीनी शिरोडकर यांचे तबला वादन होईल. तबला वादनानंतर कु. रुद्राक्ष तळवणेकर यांचे सवादिनी वादन होईल.

त्यानंतर केपे संगीत केंद्रातील विद्यार्थ्यांचा गायन-वादनाचा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात सौ. श्रध्दा च्यारी, कु. लक्ष कालेकर व कु. तुळशी वेळीप यांच्या शास्त्रीय गायनाने होईल त्यानंतर कु. उर्जा च्यारी यांचे संवादिनी एकलवादन होईल त्यानंतर कु. सारंग गावडे, कु. स्वरांग गावडे, कु. सोहम नाईक, कु. सार्थ शेणवी मावजेकर, कु. साहस सावकार, कु. आयुश ठाकुर, कु. नचिकेत पै व कु. प्रज्योत पर्वतकर हे विद्यार्थी तबला सहवादन सादर करणार आहेत. त्यानंतर काणकोण संगीत केंद्रातील विद्यार्थी आपली कला

सादर करणार आहेत. त्यामध्ये सर्वप्रथम कु. ऋषीकेश म्हाळशी याचे शास्त्रीय गायन होईल व नंतर कु. ऋतीक वेळीप व कु. रुद्र पागी यांचे संवादिनी सहवादन होईल व त्यानंतर तबला सहवादनात कु. दर्पण पागी, कु. ऋषीकेश कोमरपंत, कु. तन्मय पागी व कु. राहुल वेळीप या विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने सकाळच्या सत्राची सांगता होईल.

दुपारच्या सत्राची सुरुवात वाळपई केंद्रातील विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने होणार आहे. त्यामध्ये कु. रोहन गांवकर, कु. नव्या गावस व कु. अदिती कुंभार हे विद्यार्थी शास्त्रीय गायन सादर करतील व नंतर कु. वामन च्यारी व कु. विघ्नेश राणे यांचे तबला वादन होईल. त्यानंतर कु. ह्वदानी नाईक, कु. शर्वरी केळकर, कु. सार्थक कोरगावकर व कु. सानिका गावकर यांचे संवादिनी वादन होईल. त्यांनंतर सांगे संगीत केंद्रातील विद्यार्थी आपली कला सादर करणार आहेत. त्यामध्ये कु. सौम्या कोसंबे व कु. श्रीशा बोरकर यांचे शास्त्रीय गायन होईल. त्यानंतर कु. राहिल भिसे व कु. साई शेटये यांचे तबला वादन होईल व नंतर कु. रितीका पैंगीणकर हिचे संवादिनी वादन होईल.

शेवटच्या सत्रात साखळी संगीत केंद्रातील विद्यार्थ्यांचा गायन-वादनाचा कार्यक्रम होईल. त्यामध्ये कु. सक्षम सालेलकर, कु. वित्तेश परब, कु. श्रीसाई उसापकर व कु. ग्यान्वी चोडणकर यांचे तबला सहवादन होणार आहे. त्यानंतर कु. अदवीता नाईक व कु. शुभ्रा मळीक यांचे संवादिनी वादन होईल व कार्यक्रमाची सांगता कु. रुजुला मोरजकर हिच्या शास्त्रीय गायनाने होणार आहे. संगीत केंद्रातील विद्यार्थ्यांना श्री. सुरज मोरजकर, श्री. भार्गवराम गर्दे, श्री. गीतेश गावडे, कु. तेजस तोरसकर, कु. राघव भट मुरुर यांची तबला साथ तसेच श्री. शुभम नाईक व श्री. प्रज्योत देसाई यांची संवादिनी/नगमा साथ-संगत विद्यार्थ्यांना लाभणार आहे.

दोन दिवसांचा हा संगीत कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून सर्व संगीत प्रेमी रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे कला अकादमीच्या भारतीय संगीत व नृत्य विभागातर्फे कळविण्यात आले आहे.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)